दिनांक :   .२.२०२०

**प्रति,**

**मा. केंद्रीय गृहमंत्री,**

**भारत सरकार, नवी देहली.**

**विषय : ‘नागरिकत्व सुधारणा कायद्या’च्या विरोधात गेले काही दिवस हिंसक आंदोलन करून सामान्यांना वेठीस धरणाऱ्या शाहीन बाग येथील धर्मांधांच्या विरोधात कठोर कारवाई करा....**

महोदय,

नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या विरोधात शाहीन बाग परिसरात १५ डिसेंबर २०१९ पासून धर्मांधांचे धरणे आंदोलन चालू आहे. यात प्रामुख्याने मुसलमान महिलांची संख्या लक्षणीय आहे. येथील आंदोलनात प्रतिदिन राजकीय नेत्यांसह, वलयांकित व्यक्ती आणि तथाकथित साम्यवादी विचारवंत जाऊन अक्षरशः आगीत तेल ओतल्याप्रमाणे आंदोलनाची आग दिवसेंदिवस भडकावत ठेवत आहेत. या आंदोलनाचे नियोजन करणारा ‘जे.एन्.यू.’चा माजी विद्यार्थी शरजील इमाम याने उघडपणे ‘आसामला भारतापासून तोडण्यासाठी साहाय्य करणे आपले कर्तव्य आहे; असे घडेल तेव्हा केंद्र सरकार आपले ऐकेल. रेल्वेगाड्या बंद पाडा’, असे विधान केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी तेथील मुसलमान महिलांसमोर लव्ह जिहाद, तलाक आणि बुरखा या सर्व गोष्टी करण्यास प्रोत्साहित करणारा उल्लेख भाषणात केला. ‘अशी आंदोलने देशात सर्वत्र करा’, असे आवाहन या ठिकाणाहून सातत्याने केले जात आहे; याचाच अर्थ ‘असे हिंसक आंदोलन करून असे अराजक देशभर निर्माण करा आणि देश अस्थिर करा’ असा स्पष्टच आहे.

*** तरी या संदर्भात काही बाबी आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो,**

१. एरव्ही महिलांना साधे मानवाधिकारही नाकारणारे आता त्याच महिलांच्या आडून भावनिक आवाहन करत राष्ट्रघातकी खेळी खेळत आहेत. धर्मांध महिलाही जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाल्याप्रमाणे मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होत आहेत आणि ‘त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न कसा निर्माण झाला आहे’, याचे उत्तम नाटक वठवत आहेत. ‘विद्यार्थ्यां’च्या नावाखाली चालू झालेले हे आंदोलन महिलांचे आणि लहान मुलांचे कसे झाले ?’, हे समजण्याच्या पलीकडचे आहे.

२. उपलब्ध झालेल्या माहितीनुसार शाहीनबाग परिसरात अवैध घुसखोर मुसलमान मोठ्या संख्येने रहात आहेत. यात बांगलादेशी, पाकिस्तानी, अफगाणी, म्यानमार येथील घुसखोर मुसलमान असण्याची दाट शक्यता आहे.

३. या आंदोलनामध्ये देशभरातील साम्यवादी आणि निधर्मीवादी पत्रकार, विचारवंत, युवानेते अन् कलाकार येऊन देशविरोधी गरळओक करत आहेत. येथे येणाऱ्या विविध ‘वक्त्यांची’ संख्या वाढत गेली, तशी या आंदोलनाची प्रसिद्धीही वाढत गेली आणि थेट विदेशातील संसदेपर्यंत जाऊन पोचली. एकंदरच आता या आंदोलनाने जे रूप धारण केले आहे, ते पाहता ‘विदेशी शक्तींची फूस असणारे साम्यवादी अन् धर्मांध यांनी एकत्र येऊन चालू केलेले हे हिंदूबहुल भारताच्या विरोधातील आंतरराष्ट्रीय षड्यंत्र आहे’, या संशयाला बळकटी मिळत आहे.

४. देशातील विविध भागांतून, अगदी पंजाबमधूनही देहली येथील आंदोलनासाठी खाण्या-पिण्याच्या पदार्थांची सोय केली जात आहे. या संदर्भात शाहीनबाग येथे आंदोलकांनी बसावे, यासाठी प्रतिदिन ५०० रुपये दिले जात असल्याचीही वृत्ते आहेत. यावरून या आंदोलनामागे सुनियोजित पद्धत वापरली जात असल्याचे लक्षात येते.

५. आधी काहीही न कळणाऱ्या लहान मुलांच्या तोंडी विविध वक्तव्ये घालून भावनिक आवाहन करण्यात आले. यात सहभागी महिलाही 'सरकार त्यांना मुलाबाळांसकट घराबाहेर काढणार असल्याची' धादांत खोटी विधाने करून या कायद्यांच्या विरोधात अफवा पसरवण्याचे आणि विरोधी वातावरण निर्माण करण्याचे काम करत होत्या. त्यानंतर नियोजनबद्धरित्या तिथे एकेक वक्त्याने जाऊन विखारी वक्तव्ये करणे अन् त्याचे व्हिडिओ प्रसारित करणेही चालू झाले. थोडक्यात 'गोबेल्स नीती'प्रमाणे वारंवार खोटे सांगितल्याने ते खरे वाटू लागते', तशी स्थिती निर्माण करण्यात साम्यवादी अन् धर्मांध शाहीनबागच्या माध्यमातून यशस्वी होताना दिसत आहेत.

६. काही वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींना आंदोलनस्थळी येण्यास मनाई करण्यात आली. एका महिला पत्रकाराला अश्लील भाषेत बोलून पिटाळून लावण्यात आले, तसेच तिचा पाठलागही करण्यात आला. 'झी न्यूज' वाहिनीच्या 'कॅमेरामॅन'ला धर्मांधांनी अक्षरश: घेरून धक्काबुक्की केली. एवढ्या भयावह घटना आणि वक्तव्ये चालू असतांना देहली पोलिसांनी या विरोधात काहीही कृती केल्याचे दिसून येत नाही.

७. या आंदोलनामुळे रस्त्याचा बराच भाग आंदोलकांनी व्यापल्याने, तसेच पोलिसांनी तेथे सुरक्षा निर्बंध लागू केल्याने नागरिकांना ये-जा करतांना दुहेरी त्रास होत आहे. या प्रकरणी राज्य सरकार बघ्याची भूमिका घेत आहे.

८. आंदोलनाच्या ठिकाणावरून देशभर आंदोलने करण्याची 'हाक' देण्यात आली आहे. त्याला मिळणारा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढत चालला आहे. शाहीनबागचे 'मॉडेल' समोर ठेवून जवळपास प्रत्येक शहरात असे आंदोलन करण्याची वृत्ते येत आहेत.

**⁕ तरी या संदर्भात आम्ही मागण्या करतो की,**

१. शाहीनबाग येथे जवळपास दोन महिने चाललेले आंदोलन चालू ठेवण्यासाठी एवढे पैसे कोठून मिळत आहेत, याची सखोल चौकशी करण्यात यावी.

२. हे आंदोलन म्हणजे एकप्रकारे 'जिहाद' असल्याची भावना आंदोलनकर्त्यांमध्ये निर्माण केली जात आहे. त्यामुळे या आंदोलनाच्या संदर्भात ठोस आणि निर्णायक पावले उचलायला हवीत. अन्यथा 'हे लोण कोणत्या मोठ्या संकटाला निमंत्रण देईल', हे सांगता येत नाही. त्यामुळे पोलिसांनी येथील सर्व आंदोलकांना हुसकावून लावून हा परिसर रिकामा करावा आणि नागरिकांना सामान्य जीवन जगण्यासाठी अनुकूल वातावरण बनवावे.

३. या आंदोलनात देशविरोधी किंवा समाजविघातक किंवा प्रक्षोभक वक्तव्ये करणाऱ्या नेते, वक्ते आदींच्या विरोधात गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी.

आपला विश्वासू,

स